महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
नागपूर विभागीय मंडळ, सिव्हिल लाईन्स, नागपूर ४४०००१
e-mail:-msboardnagpur@gmail.com www.nagpureduboard.in

पत्र क्रमांक /लेखा/899
नागपूर , दिनांक 14/03 /2024

प्रति,

सर्व मान्यताप्राप्त ,
मुख्याध्यापक/प्राचार्य ,
नागपूर विभागीय मंडळ, नागपूर

विषय : सन २०२३-२४ मधील राज्यातील दुष्काळग्रस्त भागातील विद्यार्थ्यांची ( इ. १० वी व इ. १२ वी ) परीक्षा शुल्क प्रतिपूर्ति योजनेची अंमलबजावणीबाबत कार्यपद्धती.

संदर्भ : १. शासन निर्णय क्र.एससीवाय-२०२३/प्र.क्र.३७/म-०७ दिनांक ३१-१०-२०२३
२. शासन निर्णय क्र.एससीवाय-२०२३/प्र.क्र.३७/म-०७ दिनांक १०-११-२०२३
३. क्र. रा.मं. /टं.वि. परीक्षा शुल्क प्रतिपूर्ति २३-२४/११३१. दि.१३-०३-२०२४
४. क्र. रा.मं. /टं.वि. परीक्षा शुल्क प्रतिपूर्ति २३-२४/११३२. दि.१३-०३-२०२४

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, शासनाचे संदर्भिय क्र.०१ व ०२ शासन निर्णयानुसार, टंचाईग्रस्त/दुष्काळग्रस्त भागातील इ .१० वी इ.१२ वी च्या संपूर्ण परीक्षा शुल्काची प्रतिपूर्ति ही राज्य मंडळ स्तरावरुन करण्यात येणार आहे. शासन निर्णयानुसार जाहीर झालेल्या दुष्काळसदृश्य ४० तालुके व याव्यतिरिक्त १०२१ महसूल विभागीत बाधित क्षेत्रातील सर्व "माध्यमिक शाळा/उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांना माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र फेब्रुवारी/मार्च २०२४" मधील परीक्षेस प्रविष्ठ झालेल्या नियमित विद्यार्थ्यांची यादी अनुक्रमे **http:// feerefund.mh-ssc.ac.in** आणि **http:// feerefund.mh-hsc.ac.in** हया लिंकवर उपलब्ध करुण दिलेली आहे सदर लिंक मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावर (mahahsscboard.in) प्रसिध्द करण्यात आली आहे.संगणक प्रणालीच्या अनुषंगाने तयार करण्यात सूचना कार्यपध्दती यासोबत देण्यात येत आहे.

सदर योजना नव्याने कार्यान्वित झाली असून या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सर्व माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांनी २० मार्च २०२४ पर्यत ऑनलाईन पद्धतीने माहिती भरावी. सोबत राज्य मंडळाच्या पत्राची प्रत जोडले आहे.

(चिंतामण वंजारी)
विभागीय सचिव ,
नागपूर विभागीय मंडळ, नागपूर

पतिलिपी:

१. मा.सचिव,राज्य मंडळ पुणे यांना माहितीस्तव सादर .
२. शिक्षण उपसंचालक नागपूर ,विभाग नागपूर यांना माहितीस्तव व पुढील कार्यवाहीस्तव सादर.
३. शिक्षधाधिकारी भंडारा/चंद्रपूर/नागपूर/वर्धा/गडचिरोली/गोंदिया यांना उचित कार्यवाहीस्तव सादर .

YUGAL

Maharashtra State Board of
Secondary & Higher Secondary
Education
S.R.No.832-A, Final Plot No. 178,
179, Near Balchitrawani, Behind
Agharkar Research Institute,
Bhamburda, Shivajinagar,
Pune-411004.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च
माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे
स.नं.८३२ए, फायनल प्लॉट नं.१७८,
१७९,बालचित्रवाणीजवळ, आघारकर
रिसर्च इन्स्टिट्युटच्या मागे, भांबुर्डा,
शिवाजीनगर,
पुणे ४११ ००४.

Tel : Chairman(P):STD .(020)-25651751 Secretary(P):25651750&EPABX -25705000& Email : secretary.stateboard@gmail.com

तातडीचे
ईमेलद्वारे

क्र.रा.मं./टं.वि.परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती२३-२४/||३|
पुणे ४११ ००४.
दिनांक – १३ मार्च २०२४

प्रति,
विभागीय सचिव
सर्व विभागीय मंडळे.

विषय – सन २०२३-२४ मधील राज्यातील दुष्काळसदृश्य भागातील विद्यार्थ्यांची (इ.१०वी व इ.१२वी) परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती योजनेची अंमलबजावणीबाबत (कार्यपध्दती)

संदर्भ –
१. शासन निर्णय क्र.एससीवाय-२०२३/प्र.क्र.३७/म-७, दि.३१/१०/२०२३
२. शासन निर्णय क्र.एससीवाय-२०२३/प्र.क्र.३७/म-७, दि.१०/११/२०२३
३. शासन निर्णय क्र.संकीर्ण २०१९/प्र.क्र.४७/एसडी-५, दि.१ ऑगस्ट, २०१९
४. शा. शुध्दीपत्रक क्र.संकीर्ण २०१९/प्र.क्र.४७/एसडी-५, दि.०३/०२/२०२०
५. शा.नि.क्र.एफईडी १५९२/१००२/(११३२)/साशि-५, दि.१८/१०/१९९३

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणांस कळविण्यात येते की, शासनाचे संदर्भीय क्र.१व २ च्या शासन निर्णयानुसार, टंचाईग्रस्त / दुष्काळग्रस्त भागातील इ.१०वी व इ.१२वी च्या विद्यार्थ्यांचे संपूर्ण परीक्षा शुल्काची प्रतिपूर्ती ही राज्यमंडळ स्तरावरुन करण्यात येणार आहे. शासन निर्णयानुसार जाहीर झालेल्या दुष्काळसदृश्य ४० तालुके व याव्यतिरिक्त १०२१ महसूल विभागातील बाधित क्षेत्रातील सर्व माध्यमिक शाळा / उच्च माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांना 'माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी - मार्च २०२४' मधील परीक्षेस प्रविष्ठ झालेल्या नियमित विद्यार्थ्यांची यादी अनुक्रमे 'http://feerefund.mh-ssc.ac.in' आणि 'http://feerefund.mh-hsc.ac.in' ह्या लिंकवर उपलब्ध करुन दिलेली आहे. सदर लिंक मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावर (mahahsscboard.in) प्रसिध्द करण्यात आली आहे. संगणक प्रणालीच्या अनुषंगाने तयार करण्यात सूचना (कार्यपध्दती) यासोबत देण्यात येत आहेत.

सदर योजना नव्याने कार्यान्वित झाली असून या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आपल्या विभागीय मंडळ कार्यकक्षेतील सर्व माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांना दि. २० मार्च २०२४ पर्यंत ऑनलाईन पध्दतीने माहिती भरणेबाबत सूचित करण्यात यावे. तसेच आपण वैयक्तिक लक्ष घालून विहित कालावधीमध्ये माहिती राज्यमंडळाकडे सादर करणेबाबत संबंधितांना पाठपुरावा करणे आवश्यक आहे

(अनुराधा ओक)
सचिव
राज्यमंडळ, पुणे

प्रत माहितीस्तव तथा तातडीच्या पुढील कार्यवाहीसाठी -
१. मा.प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई ३२.
२. मा.आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१.
३. मा.शिक्षण संचालक (योजना), मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१
४. विभागीय शिक्षण उपसंचालक - पुणे/नागपूर/छ.संभाजीनगर / अमरावती / नाशिक / लातूर / कोल्हापूर / बृहन्मुंबई - यांना कळविण्यात येते की ,सदर आदेशानुसार सर्व कार्यवाही तातडीने पूर्ण होईल असे पहावे.
५. शिक्षणाधिकारी(माध्यमिक)- यांना कळविण्यात येते की ,तातडीने सर्व मुख्याध्यापक/प्राचार्य यांचेशी समक्ष संपर्क साधून बाधित क्षेत्रातील पात्र विद्यार्थ्यांची माहिती ऑनलाईन पध्दतीने राज्यमंडळास विहित वेळेमध्ये सादर होण्याच्या दृष्टीने पाठपुरावा करावा.
६. श्रीमती योगिता देशमुख, कक्ष अधिकारी (SD-5), शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई ३२

## सन २०२३-२४ मध्ये राज्यातील जाहीर झालेले दुष्काळ सदृश्य ४० तालुके व त्याव्यतिरिक्त १०२१ महसूल विभागातील इ.१०वी, इ.१२वीच्या विद्यार्थ्यांना RTGS / NEFT द्वारे परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती योजना

2/3

### * कार्यपध्दती*

१. शासन निर्णयानुसार जाहीर झालेल्या दुष्काळ सदृश्य १५ जिल्ह्यातील ४० तालुके व या तालुक्यांव्यतिरिक्त १०२१ महसूल विभागातील, बाधित क्षेत्रातील सर्व माध्यमिक शाळा / उच्च माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांना 'माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी / मार्च २०२४' मधील परीक्षेस प्रविष्ठ झालेल्या नियमित विद्यार्थ्यांची यादी इ.१०वीसाठी 'http://feerefund.mh-ssc.ac.in' आणि इ.१२वीसाठी 'http://feerefund.mh-hsc.ac.in' ह्या दोन लिंकवर उपलब्ध करुन दिलेली आहे. सदर लिंक मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावर http://mahahsscboard.in प्रसिध्द करण्यात आली आहे.

२. सदर लिंकवर पहिल्या रकान्यात विद्यार्थ्यांनी परीक्षा आवेदनपत्रामध्ये सादर केलेल्या माहितीच्या आधारे, माध्यमिक शाळा / उच्च माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयाचे नाव व सांकेतिक क्रमांक (Index Number), विद्यार्थ्याचे नाव, विद्यार्थ्यांचे गाव, महसूल मंडळ, तालुका, जिल्हा, विद्यार्थ्यांचा बैठक क्रमांक, आधार क्रमांक, आवेदनपत्रामध्ये नमूद केलेला Bank Account Number, Bank IFSC code अशी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. सदर माहितीमध्ये त्रुटी निदर्शनास आल्याने Bank account चा तपशील नव्याने मागविण्यात येत आहे.

३. मुख्याध्यापक / प्राचार्य , माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालय यांनी दुस-या रकान्यामध्ये नमूद केलेले पाच पात्रता निकष तपासून त्यापुढे बरोबर (√) असे दर्शविल्यानंतरच तो विद्यार्थी ह्या योजनेंतर्गत परीक्षा शुल्क प्रतिपूर्तीसाठी पात्र होणार आहे. अन्यथा सदर विद्यार्थी ह्या योजनेंतर्गत परीक्षा शुल्क प्रतिपूर्तीसाठी अपात्र ठरणार आहे.

४. पात्र झालेल्या विद्यार्थ्यांच्या नावाखाली "Qualify" दर्शविले जाईल. त्यानंतर सदर विद्यार्थ्याची bank account ची माहिती भरण्यास रकाने उपलब्ध (enable) केले जातील. याच पध्दतीने सर्व पात्र विद्यार्थ्यांचे निश्चितीकरण करण्यात यावे.ह्या योजनेसाठी पात्र लाभार्थ्यांची सर्व माहिती क्रमाने (Bank account number, Bank IFSC code, MICR code, खातेदाराचे नाव, खातेदाराचा आधार क्रमांक, खातेदाराचे लाभार्थ्याशी नाते इ.) नव्याने भरणे आवश्यक आहे. रकान्यातील सर्व माहिती परिपूर्ण / अचूकपणे भरण्यात यावी.

कृपया मागील पानावर →

५. शासन निर्णय दि.१/८/२०१९ मधील अ.क्र.८ नुसार ही योजना स्वयं अर्थसहाय्यीत शाळा वगळता अन्य सर्व म्हणजे शासकीय / खाजगी अनुदानित / विना अनुदानित माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना लागू राहील.

६. `Qualified / Disqualified' लाभार्थ्यांची यादी प्रमाणित (यादीच्या शेवटी सहा मुद्दे नमूद केले आहेत) केल्यानंतर 'मुख्याध्यापक / प्राचार्य' यांनी स्वाक्षरी upload करावयाची आहे. स्वाक्षरी upload केल्यानंतर submit हे बटन उपलब्ध होईल. त्यानुसार bank accountचा तपशील प्राप्त झालेल्या विद्यार्थ्यांची माहिती निर्धारीत दि. २० मार्च, २०२४ अखेर online पध्दतीने राज्यमंडळास सादर (submit) करावयाची आहे. माहिती एकदा submit केल्यानंतर पुनःश्च submit करता येणार नाही.सदर माहिती online पध्दतीने राज्यमंडळास प्राप्त होणार आहे.

७. परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती योजनेंतर्गत सर्व अभिलेख (प्रमाणपत्र Annexure `A' `B') हे संबंधित माध्यमिक शाळा / उच्च माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालय स्तरावर जतन करण्यात यावेत.

८. प्रिंट घेतलेले प्रमाणपत्र, प्रपत्र 'अ' व प्रपत्र 'ब' याची एक साक्षांकीत प्रत संबंधित विभागीय मंडळास सादर करावी.

९. परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती ही राज्यमंडळ स्तरावरुन NEFT / RTGS व्दारे विद्यार्थ्यांच्या / पालकांच्या आधार संलग्न Bank account मध्ये वर्ग करण्यात येणार असल्याने, सदर माहिती उपलब्ध न झाल्यास अथवा चुकीची माहिती अथवा चुकीचा Bank Account दिल्यास सदर लाभापासून विद्यार्थी वंचित राहणार असल्याने परिपूर्ण माहिती निर्धारित कालावधीमध्ये भरण्याची दक्षता घेण्यात यावी. ही जबाबदारी पूर्णत: संबंधित मुख्याध्यापक / प्राचार्य यांची राहील.

१०. सदर योजना नव्याने कार्यान्वित झाली असल्याने, या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी मुख्याध्यापक / प्राचार्य, शिक्षणाधिकारी (माध्यमिक), विभागीय शिक्षण उपसंचालक आणि विभागीय सचिव, विभागीय मंडळ यांनी वैयक्तिक लक्ष घालून विहित कालावधीमध्ये राज्यमंडळाकडे माहिती सादर करणेबाबत पाठपुरावा करणे आवश्यक आहे.

११. उपरोक्त सर्व माहिती परिपूर्ण / अचूक भरल्याशिवाय पात्र लाभार्थ्यांना परीक्षा शुल्क प्रतिपूर्तीची रक्कम वर्ग केली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

☐ उपरोक्त १ ते ११ मधील सूचनांचे वाचन करण्यात आले असून, त्यातील तपशील समजून घेण्यात आलेला आहे.

---***---

(अनुराधा ओक)
सचिव
राज्यमंडळ, पुणे

Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education
S.R.No.832-A, Final Plot No. 178, 179, Near Balchitrawani, Behind Agharkar Research Institute, Bhamburda, Shivajinagar, Pune-411004.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे
स.नं.८३२अ, फायनल प्लॉट नं.१७८, १७९,बालचित्रवाणीजवळ, आघारकर रिसर्च इन्स्टिट्युटच्या मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे ४११ ००४.

Tel : Chairman(P):STD .(020)-25651751 Secretary(P):25651750&EPABX -25705000& Email : secretary.stateboard@gmail.com

1/6

तातडीचे
ईमेलद्वारे

क्र.रा.मं./द.वि.परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती२३-२४/1132
पुणे ४११ ००४.
दिनांक – १३ मार्च २०२४

प्रति,
विभागीय सचिव
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ
पुणे / नागपूर / छ.संभाजीनगर / मुंबई / कोल्हापूर / अमरावती /
नाशिक / लातूर / कोकण विभागीय मंडळ
पुणे / नागपूर / छ.संभाजीनगर / मुंबई / कोल्हापूर / अमरावती /
नाशिक / लातूर / रत्नागिरी.

विषय – सन २०२३-२४ मधील राज्यातील दुष्काळसदृश्य भागातील विद्यार्थ्यांची (इ.१०वी व इ.१२वी) परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती योजनेची अंमलबजावणीबाबत.

संदर्भ – १. शासन निर्णय क्र.एससीवाय-२०२३/प्र.क्र.३७/म-७, दि.३१/१०/२०२३
२. शासन निर्णय क्र.एससीवाय-२०२३/प्र.क्र.३७/म-७, दि.१०/११/२०२३
३. शासन निर्णय क्र.संकीर्ण २०१९/प्र.क्र.४७/एसडी-५, दि.१ ऑगस्ट, २०१९
४. शा. शुध्दीपत्रक क्र.संकीर्ण २०१९/प्र.क्र.४७/एसडी-५, दि.०३/०२/२०२०
५. शा.नि.क्र.एफईडी १५९२/१००२/(११३२)/साशि-५, दि.१८/१०/१९९३

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणांस कळविण्यात येते की,

१. संदर्भीय क्र.३ व ४ च्या शासननिर्णयाअनुसार, दुष्काळग्रस्त भागातील इ.१०वी व इ.१२वीच्या विद्यार्थ्यांच्या आकारण्यात आलेल्या संपूर्ण परीक्षा शुल्काची प्रतिपूर्ती राज्यमंडळस्तरावरुन, पात्र नियमित विद्यार्थ्यांच्या / पालकांच्या आधार संलग्न Bank account मध्ये NEFT / RTGS द्वारे करण्यात येणार आहे.

२. सन २०२३-२४ मध्ये १५ जिल्ह्यातील ४० तालुके आणि या तालुक्याव्यतिरिक्त १०२१ महसूल विभागातील, इ.१०वी व इ.१२वीच्या या योजनेस पात्र असलेल्या, नियमित विद्यार्थ्यांना आकारण्यात आलेल्या संपूर्ण परीक्षा शुल्काची प्रतिपूर्ती करावयाची आहे.

३. राज्यमंडळाने 'माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी / मार्च २०२४' मधील परीक्षेस प्रविष्ठ झालेल्या नियमित विद्यार्थ्यांची यादी 'feerefund.mh-ssc.ac.in' आणि 'feerefund.mh-hsc.ac.in' ह्या लिंकवर उपलब्ध करून दिली आहे.

क.मा.पा→

Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education
S.R.No.832-A, Final Plot No. 178, 179, Near Balchitrawani, Behind Agharkar Research Institute, Bhamburda, Shivajinagar, Pune-411004.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे
स.नं.८३२ए, फायनल प्लॉट नं.१७८, १७९बालचित्रवाणीजवळ, आघारकर रिसर्च इन्स्टिट्यूटच्या मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे ४११ ००४.

Tel : Chairman(P):STD .(020)-25651751 Secretary(P):25651750&EPABX -25705000& Email : secretary.stateboard@gmail.com



४. राज्यमंडळाने उपलब्ध केलेल्या लिंकवर नियमित विद्यार्थ्यांचा बैठक क्रमांक, विद्यार्थ्याचे नाव, बँक खाते क्रमांक, Bank IFSC code, आधार क्रमांक अशी माहिती उपलब्ध करुन दिली आहे.

५. राज्यमंडळाने उपलब्ध करुन दिलेल्या माहितीच्या पुढेच पात्र (Qualified √) रकाना उपलब्ध केला असून, त्यामध्ये Qualified (√) असा शेरा संबंधित माध्यमिक शाळा / उच्च माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालय यांनी नोंद करावयाचा आहे.

६. पात्र विद्यार्थी निश्चित करताना संदर्भीय क्र.३ व ५ च्या शासन निर्णयामध्ये नमूद पात्रता निकष आणि सन २०२३ मध्ये जाहिर करण्यात आलेल्या तालुक्यांची / महसूल विभागांची यादी विचारात घ्यावी. सदर शासन निर्णय उपरोक्त लिंकवर उपलब्ध करुन दिलेला आहे.

७. परीक्षेचा ऑनलाईन अर्ज सादर करताना काही विद्यार्थ्यांच्या बँक खात्याची माहिती उपलब्ध झाली नसेल अशा पात्र नियमित विद्यार्थ्यांसाठी 'Edit' हा पर्याय उपलब्ध करण्यात आला आहे. सदर पर्यायाचा वापर करुन विद्यार्थी / पालकांच्या बँकेचा तपशील / आधार क्रमांक अंतर्भूत करता येईल.

८. परीक्षेचा ऑनलाईन अर्ज सादर करताना देण्यात आलेल्या माहितीमध्ये जर काही सुधारणा / दुरुस्ती करावयाची असल्यास सर्वांसाठी 'EDIT' हा पर्याय उपलब्ध केलेला आहे.

९. माहिती भरणा करुन झाल्यानंतर (submit) 'मुख्याध्यापक / प्राचार्य' यांनी 'Qualified (√) / Disqualified लाभार्थ्यांची संगणकीय तयार होणारी यादी व प्रमाणपत्र हे प्रमाणित करुन, त्याची एक साक्षांकित प्रत संबंधित विभागीय मंडळास सादर करावयाची आहे.

१०. परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती योजनेंतर्गत सर्व अभिलेख हे संबंधित शाळा / उच्च माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालय स्तरावर जतन करावेत.

११. विभागीय मंडळांकडे प्राप्त होणारे प्रपत्र 'अ', प्रपत्र 'ब' आणि प्रमाणपत्र हे लेखापरीक्षणासाठी संबंधित विभागीय मंडळ स्तरावर जतन करुन ठेवावेत.

कृ.पुढील पानावर →

Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education
S.R.No.832-A, Final Plot No. 178, 179, Near Balchitrawani, Behind Agharkar Research Institute, Bhamburda, Shivajinagar, Pune-411004.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे
स.नं.८३२ए, फायनल प्लॉट नं.१७८, १७९ बालचित्रवाणीजवळ, आघारकर रिसर्च इन्स्टिट्युटच्या मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे ४११ ००४.

Tel : Chairman(P):STD .(020)-25651751 Secretary(P):25651750 EPABX :25705000 Email : secretary.stateboard@gmail.com

3/6



१२. मुख्याध्यापक / प्राचार्य यांचेकडून पात्र नियमित लाभार्थ्यांच्या यादी online द्वारे राज्यमंडळास प्राप्त झाल्यानंतर, उपरोक्त संदर्भीय क्र.३ व ४ च्या शासन निर्णयानुसार, राज्यमंडळ स्तरावरुन शासनाकडून प्राप्त होणारा निधी हा NEFT/RTGS द्वारे विद्यार्थ्यांच्या / पालकांच्या आवेदनपत्रामध्ये नमूद केलेल्या आधार संलग्न बँक खात्यामध्ये वर्ग करण्यात येईल.

तरी, यासंदर्भात आपण वैयक्तिक लक्ष घालून सदर परीक्षा शुल्काची प्रतिपुर्ती करणेसाठी, तातडीने विभागीय शिक्षण उपसंचालक आणि शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचेशी संपर्क साधून बाधित क्षेत्रातील पात्र लाभार्थ्यांचे प्रस्ताव त्वरित सादर करावेत.

(अनुराधा ओक)
सचिव
राज्यमंडळ, पुणे

प्रत माहितीस्तव तथा तातडीच्या पुढील कार्यवाहीसाठी –

१. मा.प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई ३२.
२. मा.आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१.
३. मा.शिक्षण संचालक (योजना), मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१.
४. विभागीय शिक्षण उपसंचालक -- पुणे / नागपूर / छ.संभाजीनगर / अमरावती / नाशिक / लातूर / कोल्हापूर / बृहन्मुंबई -- यांना पत्राची देण्यात येऊन कळविण्यात येते की, शासन आदेशानुसार सदर सर्व कार्यवाही तातडीने पूर्ण होईल असे पहावे.
५. शिक्षणाधिकारी (माध्यमिक), सर्व जिल्हे --

यांना कळविण्यात येते की, तातडीने सर्व मुख्याध्यापक/प्राचार्य यांचेशी समक्ष संपर्क साधून बाधित क्षेत्रातील पात्र लाभार्थींची माहिती उपरोक्त Link द्वारे त्वरित सादर होईल याची दक्षता घेण्यात यावी.

६. श्रीमती योगिता देशमुख, कक्ष अधिकारी (SD-5), शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई ३२

4/6

# प्रपत्र "अ"

**इयत्ता १०वी मार्च २०२४ च्या परीक्षा शुल्क प्रतिपूर्तीसाठी पात्र असलेल्या विद्यार्थ्यांची यादी**

(शासन निर्णय क्र.एससीवाय-२०२३/प्र.क्र.३०/म-७, दि.३१/१०/२०२३ अनुसार १५ जिल्ह्यातील ४० तालुके व दि.१०/११/२०२३ अनुसार ४० तालुक्यांव्यतिरिक्त १०२१ महसूल विभाग )

अ) शाळा / कनिष्ठ महाविद्यालय
- १. नाव :
- २. इंडेक्स क्रमांक :
- ३. पत्ता :
- ४. तालुका : जिल्हा : पिनकोड :

ब) मुख्याध्यापक / प्राचार्य
- १. नाव :
- २. भ्रमणध्वनी क्रमांक
- ३. ईमेल :

| अ.क्र | विद्यार्थ्यांचे नाव माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा मार्च 2024 | विद्यार्थ्यांचा बैठक क्रमांक | दुष्काळ / टंचाईग्रस्त यादीतील घोषित असणारे विद्यार्थ्यांचे मूळ गाव आणि महसूल | विद्यार्थ्यांचे बँक खाते क्रमांक | विद्यार्थ्यांच्या बँकेचा IFSC code |
|---|---|---|---|---|---|
| 1. | | | | | |
| 2. | | | | | |
| 3. | | | | | |
| 4. | | | | | |
| 5. | | | | | |
| 6. | | | | | |
| 7. | | | | | |
| 8. | | | | | |
| 9. | | | | | |
| 10 | | | | | |
| 11 | | | | | |
| 12 | | | | | |
| 13 | | | | | |
| 14 | | | | | |
| 15 | | | | | |
| 16 | | | | | |
| 17 | | | | | |
| 18 | | | | | |
| 19 | | | | | |
| 20 | | | | | |
| 21 | | | | | |
| 22 | | | | | |
| 23 | | | | | |
| 24 | | | | | |
| 25 | | | | | |

स्वाक्षरी व शिक्का
मुख्याध्यापक / प्राचार्य

टिप : यादीच्या प्रत्येक पृष्ठावर स्वाक्षरी करावी.

** सदर प्रपत्राची पत्र प्रत संबंधित विभागीय मंडळास सादर करावी.

5/6

# प्रपत्र "ब"

## इयत्ता १२वी फेब्रुवारी / मार्च २०२४ च्या परीक्षा शुल्क प्रतिपूर्तीसाठी पात्र असलेल्या विद्यार्थ्यांची यादी

(शासन निर्णय क्र.एससीवाय-२०२३/प्र.क्र.२७/म-७, दि. ३१/१०/२०२३ अनुसार १५ जिल्ह्यातील ४० तालुके व दि. १०/११/२०२३ अनुसार ४० तालुक्यांव्यतिरिक्त १०२१ महसूल विभाग )

आ) शाळा / कनिष्ठ महाविद्यालय

१. नाव :

२. इंडेक्स क्रमांक :

३. पत्ता :

४. तालुका : जिल्हा : पिनकोड :

ब) मुख्याध्यापक / प्राचार्य

१. नाव :

२. भ्रमणध्वनी क्रमांक

३. ईमेल :

| अ.क्र. | विद्यार्थ्याचे नाव उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी / मार्च 2024 | विद्यार्थ्यांचा बैठक क्रमांक | दुष्काळ / टंचाईसदृश्य परिस्थिती घोषित असणाऱ्या विद्यार्थ्याचे मूळ गाव आणि महसूल | विद्यार्थ्याचे बँक खाते क्रमांक | विद्यार्थ्याच्या बँकेचा IFSC code |
|---|---|---|---|---|---|
| 1 | | | | | |
| 2 | | | | | |
| 3 | | | | | |
| 4 | | | | | |
| 5 | | | | | |
| 6 | | | | | |
| 7 | | | | | |
| 8 | | | | | |
| 9 | | | | | |
| 10 | | | | | |
| 11 | | | | | |
| 12 | | | | | |
| 13 | | | | | |
| 14 | | | | | |
| 15 | | | | | |
| 16 | | | | | |
| 17 | | | | | |
| 18 | | | | | |
| 19 | | | | | |
| 20 | | | | | |
| 21 | | | | | |
| 22 | | | | | |
| 23 | | | | | |
| 24 | | | | | |
| 25 | | | | | |

टिप : १. यादीच्या प्रत्येक पृष्ठावर स्वाक्षरी असावी.

** सदर प्रपत्राची एक प्रत संबंधित विभागीय मंडळास सादर करावी.

स्वाक्षरी व शिक्का

मुख्याध्यापक / प्राचार्य

6/6

# प्रमाणपत्र(माध्यमिक / उच्च माध्यमिक)

प्रमाणित करण्यात येते की,

१. उपरोक्त यादीमध्ये शासन निर्णय (शालेय शिक्षण विभाग) दिनांक १८ ऑक्टोबर १९९३ नुसार आणि दि.१/८/२०१९ अनुसार, पात्र (संख्या ..............) असलेल्या सर्व नियमित विद्यार्थ्यांची नावे समाविष्ट आहेत.

२. विद्यार्थ्यांच्या नावांची दुबार नोंद घेण्यात आलेली नाही.

३. उपरोक्त पैकी कोणत्याही विद्यार्थ्याला इतर शासकीय योजनेतून परीक्षा शुल्क माफीचा लाभ देण्यात आलेला नाही.

४. यादीमध्ये नमूद केलेल्या पात्र (संख्या ...........) विद्यार्थ्यांची संपूर्ण परीक्षा शुल्क मंडळामध्ये भरणा केली आहे.

स्थळ : ..........................

दिनांक : ..........................

स्वाक्षरी व शिक्का

मुख्याध्यापक / प्राचार्य